MHRT080000322022

नियमित दिवाणी दावा नंबर ३/२०२२
निशाण ६४ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज हा वादी क्र. २ ने आदेश ६ नियम १७ या दिवाणी प्रक्रिया संहितेखाली असलेल्या तरतुदीनुसार दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता केलेला आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रस्तुतचे प्रकरण वादीने प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीमध्ये रस्ता करण्याचे व त्यांच्या डांबरीकरणाचे आणि मजबुतीचे काम करु नये याकरीता निरंतर मनाईचा आदेश करणेबाबत दाखल केला आहे. वादी क्र. १ यांच्या निधनानंतर प्रस्तावीत वादी क्र. १अ, १ब, १क, १ड, १इ, १फ हे कायदेशीर वारस असल्याने वादी क्र. १ यांच्या नावाच्या पुढे मयत असे नमुद करुन त्यापुढे वारस वादी क्र. १अ, १ब, १क, १ड, १इ, १फ असे लिहिण्याची परवानगी मिळून दावा दुरुस्ती करण्यास विनंती आहे. अर्जाच्या पृष्टयर्थ नि. ६५ येथे वादीने प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

२. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर आपेल लेखी म्हणणे देवून या अर्जावर हरकत नसल्याचे सांगितले आहे.

३. प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र. १ व २ विरुध्द निरंतरची ताकीद तसेच प्रतिवादी क्र. १ व २ यांनी केलेले रस्त्याचे काम बेकायदेशीर आहे असा ठराव होवून मिळण्याकरीता दाखल आहे. वादी क्र. १ ते ३ब व प्रतिवादी क्र. ३ ते ७ यांची नावे दावा मिळकतीला मालक म्हणून नमुद आहेत. सबब वादी क्र. १ च्या पश्चात त्यांच्या वारसांचे म्हणणे अभिलेखावर येणे गरजेचे आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम ८ नुसार प्रस्तावीत वारस हे पक्षकार म्हणून समाविष्ट करणे गरजेचे आहे. त्यांना पक्षकार केल्यास प्रतिवादीचे कोणतेही अपरिमित नुकसान होणार नाही.

दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये पक्षकार समाविष्ट केल्यानंतर प्रस्तावीत दुरुस्ती दाव्यात करणे गरजेचे असते. वादी करु इच्छीत असलेली दुरुस्ती अत्यंत औपचारीक आहे. सबब अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब पुढील आदेश करण्यात येता.

**- आदेश -**

१ अर्ज निशाणी ६४ मंजूर करण्यात येतो.

२ वादी क्र. १ यांच्या नावासमोर मयत असे नमुद करण्यास व वारस प्रस्तावित वादी क्र. १अ, १ब, १क, १ड, १इ, १फ असे लिहिण्यास परवानगी देण्यात येते.

३ अर्ज नि. ६४ ची पुर्तता केल्यानंतर सदरची दावा दुरुस्ती करण्यात यावी तसेच दुरुस्त दाव्याची प्रत त्वरीत अभिलेखावर दाखल करावी व त्याची प्रत विरुध्द पक्षास देणे

४ वादी क्र. १ यांचे प्रस्तावित वारस याच्याबाबतची दावा दुरुस्ती केल्यानंतर त्यांना दाव्याकामी समन्स काढण्यात यावेत व त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात यावी.

**सही /-**
**(श्रुती ह. पाटील )**
**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर**
**देवरुख**

**दि. २९/११/२०२३**

## CERTIFICATE

order in R.C.S. No.3-2022 Exh. 64

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | T. N. Khade (Jr. Clerk) |
| Court name | : | Jt. Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 29/11/2023 |
| Order signed by the presiding officer on | : | 29/11/2023 |
| Order uploaded on | : | 29/11/2023 |